एकाकी पदाच्या आरक्षणाबाबत..

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक, क्रमांक- बीसीसी-१०९३/३१८७/प्र. क्र. १७१/९३/१६-ब,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १२ जुलै, १९९६.

पहा : १. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी-१०७८/१८१०/२६३/१६-ब, दिनांक १. ३. १९८९.

२. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी-१०८८/१८१०/२६३/१६-ब, दिनांक १५. ९. १९८९.

३. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-बीसीसी-१०९३/३१८७/प्र. क्र. १७१/९३/१६-ब, दि. २१ फेब्रुवारी, १९९४.

शासन परिपत्रक :

उपरोक्त समक्रमांकाच्या दि. २१ फेब्रुवारी, १९९४ अन्वये "फक्त एकच पद[ ISOLATED ] असलेल्या संवर्गात सुरुवातीला अथवा त्यापुढील भरती वेळेत भरती/बढतीबाबतचे आरक्षण लागू होणार नाही म्हणजेच हे आदेश निर्गमित केल्यानंतर ज्या ज्या कर्मचा-यांना एकाकी पदावर नेमणूका दिल्या जातील त्या तात्पुरत्या स्वरूपात तर असतील शिवाय त्या ज्येष्ठता व गुणवत्तेनुसार तसेच त्या औरंगाबाद खंड पीठाच्या याचिका क्रमांक-३३८१/९१च्या निर्णयाच्या अधीन राहून दिल्या जातील" असे आदेश देण्यात आले होते.

२. उपरोक्त औरंगाबाद खंडपीठाकडे दाखल केलेली याचिका क्र. ३३८१/९१ ही मागे घेण्यात आली असल्याने एकाकी पदांवर नेमणूका करताना त्या औरंगाबाद खंडपीठाच्या क्रमांक-३३८१/९१ च्या निर्णयाच्या अधीन राहून देण्याची आवश्यकता नाही, तसेच यापूर्वी ज्या नियुक्त्या सदर न्यायालयीन प्रकरणाच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरूपात करण्यात आल्या होत्या त्या नियमित करण्याबाबत संबंधित अधिका-यांना आवश्यक ते आदेश निर्गमित करावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ शि. शा. हिरोजगरे ],
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
राज्यपाल यांचे सचिव,

राज्यपालांचे सचिव

मुख्यमंत्री यांचे सचिव,

सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,

* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,

* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,

* प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,

* आयुक्त, अनुसूचित जाती/जमाती, नवी दिल्ली,

* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

सर्व मंत्रालयीन विभाग,

सर्व सहाय्यक आयुक्त[मागासवर्गकक्ष]/नागपूर/अमरावती/औरंगाबाद/कोकण विभाग/पुणे/नाशिक,

सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,

सचिव समाजकल्याण विभाग,

संचालक, समाजकल्याण, पुणे,

आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,

संचालक, आदिवासी संशोधन, व प्रशिक्षण संस्था, पुणे,

सर्व जिल्हा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी प्रकल्प,

सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील इतर सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख.

* पत्राने.